२'४०
२५-५-२०

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १२/०५/२०२३

### प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

मा. मंत्री (शालेय शिक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली “समग्र शिक्षा व स्टार्स प्रकल्पाच्या प्रभावी अंमलेबजावणी करिता” क्षेत्रीय अधिकारी यांची दिनांक २८.०४.२३ ते २९.०४.२३ या दोन दिवसीय राज्यस्तरीय निवारी कार्यशाळा “The Ambey Valley City” लोणावळा, पुणे येथ आयोजीत करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजिज शेख महोदय उपस्थित होते.

त्या अनुषंगाने दिनांक ९ मे, २०२३ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजिज शेख यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृह येथे आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीत श्री.जमीर लेंगरेकर मा. अतिरिक्त आयुक्त (शिक्षण), श्री. शरद दशेमुख मुख्य लेखा परिक्षक, श्री. किरण भिलारे मुख्य लेखा अधिकारी, डॉ. सुभाष जाधव उप आयुक्त (शिक्षण), श्री. अशोक नाईकवाडे उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक मोरे प्रशासन अधिकारी, श्रीमती. निलम कदम उप लेखाधिकारी, श्रीमती. सलोनी निवकर कार्यालयीन अधिक्षक (शिक्षण) व श्री. योगेश मराठे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी हे उपस्थित होते तसेच शिक्षण विभागाचे व समग्र शिक्षाचे सर्व कर्मचारी देखील उपस्थित होते.

यादरम्यान निपुण भारत याविषयी मार्गदर्शन केले तसेच आयुक्त तथा प्रशाकस श्री. अजिज शेख यांनी शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा दर्जा कसा सुधारता येईल व शाळेची भौतिक सुविधा व उल्हासनगर महानगरपालिकेतील महानगरपालिकांच्या शाळा कशा सुधाता येतील यासंदर्भात मार्गदर्शन केले व अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या.

समग्र शिक्षा सामवेशित शिक्षणासंदर्भात सादरीकरण सादर करण्यात आले. त्यात दिव्यांग विद्यार्थ्यांची संख्या, प्रमाणपत्र घाकरी विद्यार्थ्यांची संख्या यु.डी.आय.डी काढलेल्या विद्यार्थ्यांची संख्या तसेच भत्ते अदा केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यासमोर मांडण्यात आली.

दिव्यांग विद्यार्थी कुठल्याही सोयी सुविधांपासुन वंचित राहिला नाही पाहिजे. “रीड महाराष्ट्र”, “सेलिब्रेटी डेज”, “आजी आजोबा दिवस”, “केद्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश देणे”, “चोदाखडी सराव”, “साईकलदान”, “गीत मंच”, “समय दान”, “खगोलशास्त्र लॅब बनविणे”, “आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी चेंजिंग रूम तयार करणे अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची उपस्थिती व त्यांची गुणवत्ता सुधारता येईल यावर मा. आयुक्त तथा प्रशासक महोदयांनी अंमलबजावणी करणेबाबत सुचना केली.

जे विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करत आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता “गरूड झेप” या एप्लीकेशन बाबत उप आयुक्त (शिक्षण) डॉ. सुभाष जाधव यांना सांगितले व या ॲप्लिकेशन विषयी अधिकाधिक जगजागृती व्हावी याकरिता आपण प्रयत्न करावे असे सांगितले. तसचे शिक्षण विभाग माहे मे अखेरपर्यंत मुख्य कार्यालयात हलविण्यात हलविले जाईल. शाळा क्र. १७, शाळा क्र.१८ व शाळा क्र. २४ या शळैच्या इमारीतीच्या बांधकामाविषयी तात्काळ ई-निविदा काढण्याच्या सुचना दण्यात आल्या.

१२/५/२३

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.